# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.२१४५/२०२०/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.दिलीप तुकाराम निकम, रा. लक्ष्मीछाया अपार्टमेन्ट, फ्लॅट नं.११, शिवाजी चौक, पाथरवट लेन, पंचवटी, नाशिक ४२२ ००३. | सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय, के.टी.एच.एम.कॉलेज समोर, गंगापूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. | पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, के.टी.एच.एम.कॉलेज समोर, गंगापूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिल संदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये आपल्या कार्यालयातील के.पी.साळवी, पोलीस निरीक्षक जन माहिती अधिकारी व वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड पंचवटी पोलीस ठाणे या पोलीस अधिकारी यांच्याविरुध्द नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात फौजदारी केस संबंधातील न्यायालयातील समन्स पाठवण्यासाठी शासकीय सेवा करणा-या सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, कर्मचा-यांची संपूर्ण नावे, वय, कायमस्वरुपी निवासाचा संपूर्ण पत्ता यासह संपूर्ण माहिती मला मा.न्यायालयीन कामकाजासाठी २४ तासात देण्यात यावी अशी मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २४/११/२०२२ रोजी सुनावणीअंती खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थीस त्यांच्या दि.१०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक श्री.मनोज करंजे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.२२२/१५/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहे की, याप्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन / विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपिल सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

२. सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक श्री.मनोज करंजे यांनी आयोगाकडे कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. आयोगाने सदर द्वितीय अपिल प्रकरणी पारित केलेल्या निर्णयात असे स्पष्ट नमूद केले आहे की, अपिलार्थी यांच्या दि.१०/०७/२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२३/०७/२०२० च्या पत्रान्वये माहिती नाकारली. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

दि.१५/०९/२०२० च्या पत्रान्वये प्रमुख लिपिक, पत्रव्यवहार शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक शहर यांच्याकडून प्राप्त झालेले पत्राची प्रत पुरविली. सदर पत्रात नमूद केले आहे की, माहिती अर्जात नमूद केलेले अधिकारी हे सद्य:स्थितीत पोलीस आयुक्त, नाशिक शहर आस्थापनेवर नेमणूकीस नाही, त्यांची नाशिक शहर घटकातून इतर घटकामध्ये बदली झाल्याने विचारणा करण्यात आलेली माहिती या शाखेत उपलब्ध नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल निर्णयानुसार दि.१५/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती या शाखेत उपलब्ध नाही असे कळविल्याचे स्पष्ट होते. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वैयक्तिक नसून अभिलेखानुसार त्यांचे नाव व ते सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचा पत्ता पुरविणे शक्य होते. मात्र प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानंतर देखील सदर माहिती देण्यात आली नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. तसेच आयोगाने दिलेल्या आदेशानुसारु तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक श्री.मनोज करंजे यांनी आयोगाकडे कोणताही लेखी खुलासा सादर केलेला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक श्री.मनोज करंजे यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी त्यांच्या वेतनातून (सेवानिवृत्त झालेले असल्यास त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून) समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.२१४५/२०२०/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 21/08/2025

---

प्रत :- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, के.टी.एच.एम.कॉलेज समोर, गंगापूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक.

---

जावक क्र. 6565

दिनांक :- 28 AUG 2025